# राजर्षी शाहु महाराजांची शोषित घटकांविषयीची भूमिका

**डॉ.सदाशिव दंदे**
इतिहास विभाग प्रमुख
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

प्राचीन काळापासून भारतीय समाजव्यस्थेत शोषक व शोषित या दोन वर्गामध्ये संघर्ष सुरु असल्याचे दिसून येते, या दोन वर्गामध्ये संघर्ष सुरु असल्याचे दिसून येते, यामध्ये शोषकवर्ग साम, दाम, दंड व भेद याद्वारे शोषितांचे पिढयानं पिढया शोषण करत येत आहे. प्राचीनकाळात वर्णव्यवस्थेमुळे भारतीय समाजव्यवस्थेवर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन वर्णीयाकडून स्वार्थी भूमिकेतून शुद्रांचे शोषण होत होते. इ.स. पूर्व ६व्या शतकात भगवान गौतमबुध्दांनी समतेचा विचार मांडून त्याला आपल्या कार्याने कृतीची जोड दिली हि भारतातील पाहिली सामाजिक क्रांती म्हणावी लागेल. महामानवाच्या या मानवतावादी भूमिकेमुळे भारतात परिवर्तनाचे वारे वाहू लागले आणि त्यामुळे शोषित, वंचित, उपेक्षित वर्गातील लोकांना जगण्याचे बळ मिळाले, दबलेल्या या लोकांमध्ये जीवन जगण्यासाठी एक नवा आशावाद निर्माण झाला. प्राचीनकाळात विविध राजकीय स्थित्यंतरे झाली पण यात शोषीत वर्ग समाजव्यवस्थेतील सामाजिक पंरपरा व अंधश्रध्देमुळे होरपळतच राहिला आणि त्यांची संघर्षयात्रा सुरु राहिली. पुढे मध्यकाळात १२ व्या शतकात बसवेश्वरांनी अनुभव मंटपाच्या माध्यमातून समाजात स्त्री-पुरुष समानता प्रचलित केली. त्याचबरोबर जातीव्यस्थेला मोठा सुरुंग आपल्या कार्याने लावला व त्यातून भारतात लोकशाही मुल्य रुजविण्याचा मोठयाप्रमाणात प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वरांचे हे कार्य म्हणजे भारतातील एक दुसरी सामाजिक क्रांती होती असे म्हणता येईल. त्यानंतर पुढे महानुभव पंथ, वारकरी संप्रदाय यांनी आपल्या कार्याने सामाजिक ऐक्य व सलोख्यासाठी साहित्य व प्रबोधनाद्वारे महाराष्ट्रात व पर्यायाने भारतीय समाज ढवळून काढला, पुढे १९ व्या शतकात आधुनिककाळाच्या उष:काळात स्थितीशील समाज मोठयाप्रमाणात गतीशीलतेकडे वाटचाल करू लागला यामध्ये प्रामुख्याने राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू व डॉ. बाबासोहब आंबेडकराचे कार्य व त्यांची भूमिका क्रांतीकारक ठरली, भारतीय समाजातील शोषीत घटकांना मानवेतचा प्रवाहात आणणारी ठरली यामध्ये कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे शोषीत, वंचित व उपेक्षित घटकांविषयीचे कार्य भारतीय समाजाच्या दृष्टीने परिवर्तनवादी ठरले. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात आपल्या राजकीय कारकिर्दीत राजदंडाचा वापर शोषितांच्या उध्दारासाठी केला, त्यांची शोषितांविषयीची मानवतेची व समतेची भूमिका भारतातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अन्यायी जुलमी राजेशाही, जहागीरदार, सरंजामदार, जमीनदार व धर्माच्या नावावर, परंपरेच्या नावावर शोषण करणाऱ्या ब्राह्मण्य प्रवृत्तीला चपराक देणारी ठरली. सदर शोधनिंबधतून राजर्षी शाहू महाराजांच्या या प्रबोधनात्मक कार्यावर प्रकाश टाकण्याचा अल्पसा प्रयत्न आहे.

राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीचा पूर्वीपासून शिक्षण ही ब्राह्मणांची मक्तेदारी होती. त्यामुळे ब्राह्मणोत्तर बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता. शिक्षणाचा अभाव हेच बहुजनाच्या मागसलेपणाचे प्रमुख कारण आहे हे जाणून महाराजांनी "१९१६ साली प्रत्यक्ष मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा कोल्हापूर राज्यात लागू केला. या कायद्यानूसार ०६ ते १४ वयोगटातील सर्व मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले."[०१] शाहू महाराजांनी घेतलेल्या या क्रांतीकारी निर्णयामुळे कोल्हापूर संस्थांनातील शोषीत, वंचीत वर्ग शिक्षणाचा प्रवाहात आला आणि त्यांचे अज्ञानाकडून ज्ञानाकडे, अंधारातून प्रकाशाकडे मार्गक्रमण सुरु झाले, शाहू महाराजांनी बहुजनांना शिक्षणाच्या प्रवहात आणल्यानंतर "कोल्हापूर, पुणे, अहमदनगर, नाशिक व नागपूर येथील अनेक वसतिगृहांना आर्थिक मदत केली व १९०१ पासून बहुजनासाठी विविध वसतिगृहे स्थापन केली."[०२] बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे स्थापन करण्याचा पहिला मान शाहु महाराजांना द्यावा लागतो. त्यांनीच हे सामाजिक परिवर्तनवादी कार्य करून वंचीत घटकांना न्याय मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीचा पूर्वीपासून "महार, मांग, रामोशी, बेरड व कोळी इ. जातीला सरकारने गुन्हेगार जमाती ठरवून त्यांच्यावर दररोज पोलीस ठाण्यावर हजेरी देण्याचे बंधन घालण्यात आले होते. या हजेरीच्या

सक्तीमुळे घाबरून जाणाऱ्या या लोकांचे अधिकारीवर्ग शोषण करत असे. "[३] राजर्षी शाहू महाराजांनी या वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी "२७ जुलै १९१८ रोजी एक आदेश काढून महार, मांग, चांभार, रामोशी व बेरड या जातीतील लोकांची हजेरी पध्दत बंद केली."[४] अस्पृश्य समाजावरील हजेरी बंदीचा महाराजांनी काढलेला आदेश हा अस्पृश्य मुक्तीचा पहिला आदेश ठरतो. महाराजांच्या या भुमिकेमूळे तत्कालिन काळातील अधिकारीवर्गाच्या अरेरावी वृत्तीलाही आळा घातला गेला. आणि सवर्णांची अस्पृश्याविषयी संकूचित दृष्टीकोन बदलण्यासाठीचा हा मोठा निर्णय होता.

हजेरी प्रमाणेच महार समाजावर वेठबेरळ ही अमानुष पध्दत लादली गेली होती. या पध्दतीच्या नावाखाली पाटील, कुलकर्णी व चौगुला हे गाववतनदार व सरकारी अधिकारी महार लोकांकडून विभिन्न प्रकारची कामे कोणालाही मोबदला न देता करवून घेत असत. महार हा सुध्दा गाववतनदार होता परंतु पाटील कुलकर्णी व चौगेलधाप्रमाणे त्यांच्या वतनाला प्रतिष्ठा नव्हती, महाराष्ट्रातील समाजव्यवस्थेत महार वतन म्हणजे एक समाजातील गुलामगिरीच होती, या अमानवी पध्दतीविषयी विचार चिंतन करून "महाराजांनी आपल्या संस्थानात मानगाव परिषदेनंतर काही काळात वेठबिगारी पध्दत कायद्याने बंद केली."[५] आणि जर या कायद्याचे कोणी उल्लघंन केले तर त्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद केली. महाराजांची ही क्रांतीकारी भूमिका अस्पृश्य समाजाचे शोषण थांबविण्यात व या घटकाला योग्य न्याय देणारी ठरली. या वर्गाला मानवतेच्या प्रवाहात आणारी ठरली.

महाराष्ट्रातील दलित वर्ग त्यांच्या आडनावामुळे अस्पृश्य आहे हे ओळखले जात असे. अस्पृश्य समाजातील या विशिष्ट प्रकारच्या आडनावामुळे समाजातील इतर स्पृश्यवर्गाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन लगेच बदलत असे आणि त्यामुळे या वर्गावर अन्याय होत असे परिणाम यामुळे त्यांचे कुठल्याही क्षेत्रातील साधे-सोपे काम अवघड होत असे या अडचणी लक्षात घेऊन महाराजांनी वरिष्ठ वर्गातील लोकांची मानसिकता बदलण्यासाठी अस्पृश्यांच्या मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी "अस्पृश्य लोकांना जाट, सरदार, पंडीत अशी नावे दिली."[६]

अशाप्रकारे महारजानी अस्पृश्यांचे शोषण थांबविण्यासाठी व कनिष्ठ वर्गातील न्युनगंडाचे भाव कमी करण्यासाठी कायद्याबरोबर वेगवेगळया मार्गाचा आवलंब केला.

अस्पृश्य लोकांप्रमाणेच राजर्षी शाहू महाराजांनी महाराष्ट्रातील भटक्या जमातीतील लोकांच्या उध्दारासाठी विशेष प्रयत्न केले. भटक्या जमाती गावगाडयात नव्हत्या कारण ते सतत भटकत असत, काही जंगलाच्या आश्रयाने राहत असत, काही सुसंस्कृत जमाती समाजाच्या अवतीभोवती भटकत होत्या अंगी असणारे काही कसब, कला दाखवून त्या जगत होत्या. पोटाची खळगी भरण्यासाठी या जमातीच लोक पंरपरागत व्यवसाय करत असत. या जमाती मुळात चोर, दरोडेखोर नव्हत्या पण पुढे देशातील राजकीय परिस्थिती बदलली इंग्रजानी भारतातील अनेक राज्य नष्ट केली. सर्वत्र आपले वर्चस्व निर्माण केली. त्यामुळे भारतात अनेक राजकीय, सामाजिक उलथापालथ झाली, त्यामुळे काही भटक्याच्या जीवनपध्दतीस धक्के बसले, परिणाम त्यांच्यापैकी अनेकांचे उदरनिर्वाहाची साधने नष्ट झाली, या बदलत्या परिस्थितीमुळे काहींनी अवैद्य मार्गांचा अवलंब केल्याने ते चोऱ्या, लुटालुट अशा कृत्यात सापडू लागली, त्यामुळे इंग्रजानी काहीबरोबर सर्व भटक्यांना गुन्हेगार जमात म्हणून घोषीत केले. त्यामध्ये बंजारा, राजपूत, भामटा, टकारी भामटा, बेरड, मांगगारुडी फासेपारधी, कोल्हाटी, छप्परबंद केकाडी, इ. भटकया जातीना गुन्हेगार जाती म्हणून संबोधत आले होते.

राजर्षी शाहू महाराजांनी या भटक्या जातींना संस्थांनामध्ये जागा देवुन एका ठिकाणी स्थिर केले. त्यांना गुन्हेगारी मार्गापासून प्रवृत्त करून सन्मार्गाला लावले.[७] जंगबाजीत तरबेज असणाऱ्या फासेफारथ्यांना त्यात लाल्या व आरण्या या पुढाऱ्यांनाच संस्थांनातील सोनतळी कॅम्पचा खास पहाऱ्यांवरच नेमले, तर १९१२ साली खास आदेश काढून कोल्हापूरच्या कोटतीर्थच्या माळावर २३ फासेपारधी कुटुंबाना जागा देऊन स्वत:ची घरे बांधण्यासाठी त्यांना १२०० रु. ची मदत मंजूर केली.[८]

**निष्कर्ष:**

वरील विवेचनावरून पुढील काही निष्कर्ष निघतात.

- समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राजदंडाचा वापर करून विविध कायदे केले जे आजही उपयोगी आहेत.
- तत्कालिन समाजव्यवस्थेतील सवर्ण वर्गाचा विरोध पत्कारून अनेक समाजसुधारणांसाठी विविध कायदे केले व त्यांची अमंलबजावणी स्वतःपासून केल्याचे दिसून येते तसेच ते बोलके समाजसुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक राजे होते.
- समाजाच्या विकासापासून दूर असणारा दुर्बल, अल्पसंख्याक, भटक्या घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी त्या काळात केले जे आजही प्रेरणादायी असल्याचे दिसून येते.
- राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कार्यकालात समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राजसिंहासनाचा उपयोग करण्याचे कार्य केले वअसे करणारे काही मोजक्याच राजांमध्ये यांचा समावेश होतो.

अशाप्रकारे शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात राजदंडाचा अवलंब शोषीत, वंचित, उपेक्षिताच्या उध्दारासाठी केला. तसेच आपल्या अनेक क्रांतीकारी निर्णयाने महाराष्ट्रातील शोषीत घटकांना न्याय मिळवून दिला. महाराजाचे हे कार्य महाराष्ट्राबरोबर पर्यायाने समग्र भारतातील समाजात परिवर्तन घडवून आणणारे होते. प्रवहाच्या बाहेरील उपेक्षीत घटकांना प्रवहात आणणारे होते. आज बदलत्या राजकीय परिस्थितीत महाराजांच्या या विचार व कार्याचा वसा व वारसा राजकीय पुढाऱ्यांनी पुढे चालू ठेवण्याची गरज आहे असे झाले तर खऱ्या अर्थाने आपण त्यांच्या नावाने सामाजिक न्यायदिन साजरे करण्याचे सार्थक होईल अन्यथा सामाजिक न्याय दिन दीन होईल, असे मला वाटते.

**संदर्भग्रंथ सूची:**


०१. साळुंखे हिंदुराव, छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या आठवणी, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ.२०
०२. धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपती-एक समाज क्रांतीकारी राजा, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. १२४
०३. पवार जयसिंगराव (संपा), राजर्षी स्मारक ग्रंथ, खंड-०१, कोल्हापूर, २००१, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, पृ.१६
०४. बागडे द.रा., छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि कायदेकानून, मंगल प्रकाशन, कोल्हापूर, १९८२, पृ.१६
०५. कीर धनजंय, उपरोक्त, पृ. १५
०६. पवार जयसिंगराव, उपरोक्त, ७४६
०७. कित्ता, ६४८
०८. कित्ता, ६४७